MHAH080018972024

संपदा संतोष कुलकर्णी व इतर

वि.

कोणीही नाही

## वारस चौकशी अर्ज क्रं. ६५/२०२४ मधील निशाणी ०१ वरील आदेश

अर्जदारांनी हिंदू उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार यांचे वडील नामे सदाशिव बाबुराव सांबरे हे दि. २०/११/२०२१ रोजी जगताप हॉस्पीटल, पुणे येथे व आई नामे लिलाबाई सदाशिव सांबरे या दि. ०९/०५/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. सदर अर्जाचे कामकाज प्रलंबित असताना दरम्यानचे काळात अर्जदार क्र. ३ वृषाली सदाशिव सांबरे या दि. ०४/०७/२०२६ रोजी मयत झाल्या आहेत. त्या घटस्फोटीत होत्या व त्यांना कोणतेही अपत्य नव्हते. सध्या मयत सदाशिव बाबुराव सांबरे व लिलाबाई सदाशिव सांबरे यांनी अर्जदार क्र. १, २ व ४ हे कायदेशीर वारस आहेत. मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांच्या नावे नगर अर्बन को–ऑपरेटिव्ह बॅंक लि., अहमदनगर, शाखा – आश्वी बु., ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे विशेष बचत खाते क्र. १०१६००६०००७१५ मध्ये रक्कम रु. ६०,०००/– जमा आहेत. तसेच, त्याच शाखेमध्ये त्यांच्या नावे बचत खाते क्र. १०१६१४५०६०९५१/२ या खात्यावर धनसंचय ठेव पावती क्र. ५४९८९४ अन्वये रक्कम रु. ५३,७२५/– जमा आहेत. तसेच, त्यांच्या नावे सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा – आश्वी येथे खाते क्र. ३१६३३८८०९३७ मध्ये पावती क्र. ००८५९८९ अन्वये रक्कम रु. १,०७,३४४/– मुदत ठेव जमा आहे. असे एकुण रक्कम रु. २,२१,०६९/– इतकी त्यांच्या नावे त्यांच्या बॅंक खात्यांमध्ये जमा आहेत.

अर्जदारांनी सदर रक्कमेची संबंधीत बँकांकडे मागणी केली असता, संबंधीत बँक अधिका–यांनी अर्जदारांकडे वारस प्रमाणपत्राची मागणी केली. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. नि. १० येथे दि. ०८/०७/२०२५ रोजीचे ''नवराष्ट्र'' या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करुन, सदर अर्जाबाबत कोणास हरकती अगर तक्रारी असल्यास त्या सदर नोटीस जाहीर दिनांकापासुन ३० दिवसांच्या आत किंवा दि. १४/०८/२०२५ रोजीपर्यंत कळवाव्यात असे जाहीर करण्यात आले होते. तसेच नि.०६ नुसार सदर जाहीरनामा, तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उंबरी बाळापुर, ता. संगमनेर, तहसिल कार्यालय, संगमनेर, ता. संगमनेर व या न्यायालयामध्ये जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करण्यात आल्याचे स्पष्ट होते. तथापि, आजतागायत प्रस्तुत अर्जाबाबत कोणीही हरकती अथवा तक्रारी नोंदविलेल्या नाहीत.

४. अर्जदार क्र. २ याने स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि. २३) दाखल केले आहे. अर्जदार यांनी कागदोपत्री पुरावा म्हणुन मयत सदाशिव बाबुराव सांबरे, मयत लिलाबाई सदाशिव सांबरे यांचे मृत्यूप्रमाणपत्र/दाखले (नि. ३/१ व नि. ३/३), सेंट्रल बँक ऑफ इंडिया, आश्वी यांचेकडील दि. १८/०१/२०२३ रोजीचे पत्र (नि. ३/२), नगर अर्बन को–ऑपरेटीव्ह बँक लि., अहमदनगर, शाखा – आश्वी यांचेकडील मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे असलेली रक्कम रु. ५०,०००/– ची धनसंचय ठेव पावती क्र. ५४९८९४ ची छायांकीत प्रत (नि. ३/४), मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा – आश्वी येथे खाते क्र. ३१६३३८८०९३७ मध्ये रक्कम रु. १,००,०००/– ची पावती क्र. ००८५९८९ ची छायांकीत प्रत (नि. ३/५), नगर अर्बन को–ऑपरेटीव्ह बँक

लि., अहमदनगर, शाखा – आश्वी येथे मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे असलेल्या बचत खाते क्र. १०१६००६०००७१५ च्या पासबुकची छायांकीत प्रत (नि. ३/६) व अर्जदारांच्या आधारकार्डच्या छायांकीत प्रती दाखल केल्या आहेत. तसेच, अर्जदार क्र. १, २ व ४ यांनी निशाणी २२ येथे अर्जदार क्र. ३ वृषाली सदाशिव सांबरे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत दाखल केली आहे.

**५.** मृत्यूप्रमाणपत्र/दाखले (नि.३/१, नि. ३/३ व २२) नुसार सदाशिव बाबुराव सांबरे हे दि. २०/११/२०२१ रोजी, लिलाबाई सदाशिव सांबरे या दि. ०९/०५/२०१८ रोजी, शारदा सरोवर सोसायटी, ए २०३, विठ्ठलनगर, पुणे, ता., जि. पुणे येथे व अर्जदार क्र. ३ वृषाली सदाशिव सांबरे या दि. ०४/०७/२०२६ रोजी शारदा सरोवर, डी २०४, आनंदनगर, पुणे, ता.जि. पुणे येथे मयत झाल्याचे स्पष्ट होते. निशाणी ३/२ कडील दि. १८/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा – आश्वी यांनी अर्जदार क्र. २ यांचेकडे वारस प्रमाणपत्राची मागणी केल्याचे दिसुन येते. निशाणी ३/४ कडील नगर अर्बन को–ऑपरेटीव्ह बँक लि., अहमदनगर, शाखा – आश्वी यांचेकडील धनसंचय ठेव पावती क्र. ५४९८९४ ची छायांकीत प्रत पाहता, मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे रक्कम रु. ५३,७२५/– जमा असल्याचे दिसुन येते. निशाणी ३/५ कडील सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा – आश्वी यांचेकडील मुदत ठेव पावती क्र. ००८५९८९ ची छायांकीत प्रत पाहता, मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे रक्कम रु. १,०७,३४४/– जमा असल्याचे दिसुन येते. निशाणी ३/६ कडील नगर अर्बन को–ऑपरेटीव्ह बँक लि., अहमदनगर, शाखा – आश्वी यांचेकडील मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे नावे बचत खाते क्र. १०१६००६०००७१५ मध्ये दि. ०३/०७/२०२१ रोजी अखेर पर्यंत रक्कम

रु. ६१,५४८.९७/– जमा असल्याचे दिसुन येते.

**६.** अर्जदार व सामनेवाले यांनी सादर केलेला अर्ज व त्याचे पुष्ठयर्थ दाखल केलेल्या पुराव्यास कोणीही कसलेही स्वरुपाचे आव्हान दिलेले नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे वारस म्हणून, हिंदु उत्तराधिकार अधिनियमाचे तरतुदीनुसार, वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदार क्र. १, २ व ४ हे पात्र असल्याचे सिध्द होते, करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. विहीत न्यायालयीन शुल्क व मुद्रांक शुल्क भरण्याच्या अटीवर, मयत सदाशिव बाबुराव सांबरे यांचे वारस म्हणून अर्जदार क्र. १ संपदा संतोष कुलकर्णी, क्र. २ सुहास सदाशिव सांबरे व क्र. ४ हेमंत सदाशिव सांबरे यांचे नावे, हिंदु उत्तराधिकार अधिनियमाचे तरतुदीनुसार वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

KIRAN KRISHNARAO PATIL

Digitally signed by KIRAN KRISHNARAO PATIL
Date: 2026.08.14 17:02:02 +0530

(के. के. पाटील)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
संगमनेर.

संगमनेर
दि. १४/०८/२०२६

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A. M. Polade |
| | : | 2nd Jt. CJJD & JMFC Court, Sangamner. |
| Order Dated | : | 14.08.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 14.08.2026. |
| Order uploaded on | : | 14.08.2026. |